**Publication: Pudhari** **Date: Monday, 2nd February, 2015**

**Edition: Mumbai**

# हॅप्पी इंडिया प्रोजेक्टमध्ये मुंबईचा षटकार

## सर्वोत्तम २५ टीम्समध्ये मुंबईच्या ६ टिम्सचा समावेश

**मुंबई : प्रतिनिधी**

इंडिया फस्ट लाईफ इन्शुरन्सने राबविलेल्या हॅप्पी इंडिया प्रोजेक्टमध्ये मुंबईने षटकार पटकावला आहे. सर्वोत्तम २५ टीम्समध्ये मुंबईतील ६ टीम्सचा समावेश आहे.

देशभरातून सहभागी झालेल्या १५ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांमधून अतिशय कडक चाळणी प्रक्रियेनंतर सर्वोत्तम २५ टीम्स निवडल्या गेल्या.यात रेयान इंटरनॅशनल स्कूलच्या फँटास्टिक ४,जिनीयस माईड्स ऑफ अनोव्हेशन,टिम चॅलेजर्स,पोददार इंटरनॅशनल स्कूलच्या वुई चेंज आणि टिम नेक्स्ट आणि डी.जी. खेतान इंटरनॅशनल स्कूल अँड बी.के.गाडीया ए लेव्हल ज्युनियर कॉलेजची द स्पंक यांनी सर्वोत्तम २५ टीम्समध्ये स्थान पटकावले आहे.

या टीम्सनी आरोग्य,स्वच्छता,पर्यावरण,शिक्षण आणि बेरोजगारी या विषयांवर आपल्या कल्पना मांडल्या होत्या.हॅप्पी इंडियामध्ये ११ ते १६ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांकडून शिक्षण, आरोग्य,उर्जा,संधारण,सुरक्षा,पर्यावरण सुरक्षा आणि आर्थिक सर्वसमावेशकता अशा महत्वपुर्ण विषयांवरही कल्पना मांडल्या होत्या.या उपक्रमाला बँक ऑफ बडोदा आणि आंध्र बँकेचे साहाय्य प्राप्त असून पडताळणी आणि प्रक्रिया प्रमाणीकरणावर प्रक्रिया मुल्यांकनकर्ते आणि नॉलेज पार्टनर असलेल्या भारतातील केपीएमजीने देखरेख केली होती.

या सर्वोत्तम २५ टीम्सपैकी प्रत्येक टीमला ५० हजार रूपयांचे अनुदान दिले जाणार असून त्यातून या विद्यार्थ्यांना त्यांनी मांडलेल्या कल्पनांना प्रत्यक्ष रूप देण्याची संधी दिली जाणार आहे. अमंलबजावणीच्या पूर्ण कालावधीमध्ये या टीम्सना हिंदुजा हॉस्पीटल्सचे माजी व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद लेले,आयआयटी दिल्ली ॲल्युम्नसचे एस.व्ही.दिवाकर,श्रीमती दिशा छाब्रा,महिंद्रा कंपनीचे ज्येष्ठ महासंचालक राजन सुर्वे आदींचे मार्गदशन लाभले.

A Joint Venture of